महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/आस्था/नागपूर/2146/2024-25 दिनांक :- 26/08/2024

## -: परिपत्रक :-

**विषय :- महाज्योतीमार्फत भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक युवतींना केंद्रीय लोकसेवा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2024 - 25 देणेकरिता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची Response Sheet व Challenge Portal उपलब्ध करून देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील युवक युवतींना केंद्रीय लोकसेवा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2024-25 देणेकरिता विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी चाळणी परीक्षा दि.17/08/2024 रोजी घेण्यात आलेली होती. घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तसेच उत्तरपत्रिकावर कोणत्याही प्रकारचे आक्षेप असल्यास त्याबाबतचे आक्षेप नोंदविण्याकरिता (Challenge Portal) महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.26/08/2024 रोजी सायंकाळी 06.00 वाजे पासून दि.27/08/2024 रोजी सायंकाळी 06.00 वाजे पर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तसेच सदर पोर्टलचा वापर कसा करावा याचे Manual/सूचनासंच सदर परिपत्रकासोबत जोडण्यात येत आहे. त्याचे काळजीपूर्वक वाचन करून त्यानूसार उमेदवार त्यांच्याकडील आक्षेप/आव्हान नोंदवू शकतात. सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी आपली प्रश्नपत्रिका, आपण दिलेली उत्तरे व योग्य उत्तरे पाहण्यासाठी तसेच काही प्रश्नांबाबत आक्षेप असल्यास आक्षेप नोंदविण्यासाठी सदर पोर्टलचा वापर करावा.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.